विषय:- दि. १५ जानेवारी, २००८ रोजीच्या दैनिक तरुण भारतमधील एम.फिल./पीएच.डी. धारंकाबाबत कार्यालयीन खुलासा.

विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट/सेट अटीतून सूट मिळण्यासाठी महाविद्यालयाच्या सेवेत असणा-या शिक्षकांचे प्रस्ताव मागविले होते त्यामध्ये कंत्राटी, स्थानिक निवड समिती किंवा विद्यापीठ निवड समितीमार्फत निवड झालेल्या बिगर नेट/सेट अर्हताधारक उमेदवारांचे प्रस्ताव स्वतंत्ररित्या न मागविता महाविद्यालयाच्या सेवेत असणा-या सर्व शिक्षकांचे प्रस्ताव मागविले होते. महाविद्यालयाकडून जे प्रस्ताव विद्यापीठास प्राप्त झाले ते सर्वच्या सर्व प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगास अनुक्रमे दि. ०९/१२/२००२, ११/०३/२००३, १७/०६/२००३, ०८/०१/२००७ व २८/०६/२००७ रोजी पाठविण्यात आलेले आहेत त्यामध्ये कंत्राटी/स्थानिक निवड समितीमार्फत निवड झालेले/ विद्यापीठ निवड समितीमार्फत निवड झालेले/ न्यायालयाच्या निकालानुसार ज्यांचे प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठवावे असे आदेश झाले अशा सर्व शिक्षकांचे प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत.

शासन आदेश दि. २३/०१/२००४ नुसार नेट/सेट अर्हताप्राप्त उमेदवार उपलब्ध न झाल्यास २ वर्षासाठी कंत्राटी पध्दतीने अनुशेषातील पदे भरण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार संलग्न महाविद्यालयामध्ये नेट/सेट अर्हताप्राप्त उमेदवार उपलब्ध नसल्याने कंत्राटी पध्दतीने नियुक्त्या करण्यात आल्या होत्या.

दि. २३/०१/२००४ च्या शासन आदेशानुसार कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या उमेदवारांची दोन वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या नियुक्त्या संपुष्टात येत होत्या. तथापी, शासन आदेश दि. ३१/०५/२००५ नुसार शासन पत्राच्या दिनांकापासून दोन वर्षे किंवा विद्यापीठाच्या विहित निवड समितीमार्फत अर्हताप्राप्त उमेदवाराची नियुक्ती होईपर्यत यापैकी जे आधी घडेल त्या कालावधीसाठी संबंधित उमेदवारांची पुनर्नियुक्ती करण्यात यावी असे कळविण्यात आले होते. त्यानुसार बिगर नेट/सेट उमेदवारांची पुनर्नियुक्ती करण्यात आली आहे.

शासन आदेश दि. ०६/०७/२००७ नुसार दि. ३१/०५/२००५ रोजीच्या शासन आदेशाप्रमाणे ज्या अधिव्याख्यात्यांना दोन वर्षे मुदत वाढ देण्यात आली होती. अशा अधिव्याख्यात्यांची मुदत दि. ३१/०५/२००७ रोजी संपुष्टात येत असल्याने सदर अधिव्याख्यात्यांना अध्यापनाचा पुर्वानुभव असल्याने व नेट/सेट शैक्षणिक अर्हता धारक उमेदवार उपलब्ध नसल्याने ४ दिवसाचा खंड देऊन ११ महिन्याच्या कालावधीसाठी किंवा विद्यापीठाच्या विहित निवड समितीमार्फत निवड झालेल्या विहित शैक्षणिक अर्हताधारक उमेदवार नियुक्त होईपर्यत यापैकी जी आधी घडेल तोपयर्त चालू राहील व त्यानंतर मात्र त्या आपोआप संपुष्टात येतील, असे कळविले आहे.

दि. १४ जून, २००६ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाने सुधारीत शैक्षणिक अर्हता लागू केल्याबाबतची अधिसूचना प्रसिध्द केली. सदर अधिसूचनेनुसार महाराष्ट्र शासनाने दि. ०५/०९/२००६ रोजी सुधारीत शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे लागू केली होती. पीएच.डी. शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवारांना पदवी व पदव्युत्तर आणि एम.फिल. शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवारांना पदवी वर्गास शिकविण्यासाठी नेट/सेट अट लागू राहणार नाही. सदर शासन आदेश सर्व संलग्नीत महाविद्यालयांना दि. ०४/१०/२००६ नुसार कळविण्यात आला आहे.

कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या एम.फिल., पीएच.डी,, नेट/सेट पात्र असलेले अधिव्याख्याते कायम स्वरुपी सेवेत सामावून घेणेबाबत मा. सचिव उच्च व तंत्रशिक्षण मुंबई यांना दि. १४/०५/२००७ रोजी पाठविण्यात आले होते. त्यास अनुसरुन मा. उच्च न्यायालय, नागपूर यांनी एम.फिल./पीएच.डी. या शैक्षणिक अर्हतांना स्थगिती दिलेली आहे. व विद्यापीठ अनुदान आयोगाकडून अभिप्राय मागविला असल्याने दोन्ही प्रकरणी जोपर्यंत निर्णय होत नाही तोपर्यंत शासन स्तरावरुन याबाबत अंतिम निर्देश देता येणार नाहीत असे उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मुंबई यांनी दि. १८/०६/२००७ रोजीच्या पत्राने विद्यापीठास कळविले आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई नागपूर खंडपीठ यांनी दिलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र शासनाने दि. ०६ जुलै, २००७ नुसार एम.फिल./पीएच.डी. या शैक्षणिक अर्हतांना नेट/सेट अटीतून सूट देण्याबाबतच्या सुधारीत शैक्षणिक अर्हतेसंदर्भातील विद्यापीठा अनुदान आयोगाच्या दि. १४ जून, २००६ व त्या नुसार दि. ५/०९/२००६ च्या शासन आदेशास स्थगिती दिल्याचे कळविले आहे. सदर पीएच.डी. व एम.फिल. या शैक्षणिक अर्हतेंना दिलेल्या स्थगितीबाबतचा शासन आदेश सर्व संलग्नीत महाविद्यालयांना दि. ०४/०८/२००७ रोजी कळविला आहे.

संघटनेने मागणी केल्याप्रमाणे विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना दि. १४ जून, २००६ व त्यावरील महाराष्ट्र शासनाचा आदेश दि. ०५/०९/२००६ नुसार यानुसार ज्या एम.फिल/पीएच.डी अर्हताधारक अधिव्याख्यात्यांची नियुक्ती झाली आहे. व मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ यांनी सदर शैक्षणिक अर्हतेंना दि. ०६/०७/२००७ नुसार स्थगिती दिली आहे. म्हणून दि. ०५/०९/२००६ ते दि. ०५/०७/२००७ या कालावधीमध्ये नियुक्त झालेल्या अधिव्याख्यात्यांची माहिती सर्व संलग्न महाविद्यालयाकडून मागविण्यात आली आहे. माहिती प्राप्त झाल्यानंतर शासनाकडून मार्गदर्शन घेण्यात येत आहे.

--x--